आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



सारझोरा येथे सुरू झाली कृषी क्रांती » पान ३ वर



पीएसजीकडून अॅटलेटिको माद्रिदला ४-० ने दणका » पान ४ वर

वेर्णा, मंगळवार, १७ जून २०२५ I पाने ४ I ₹ ४

I REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 I Volume 13, Issue 285 I Verna, I facebook.com/dainikherald I Tuesday 17 June 2025 I Pages 4 I ₹ 4

# अज्ञात तरुणीच्या खुनाने फोंड्यात खळबळ

■ टीम दैनिक हेराल्ड :

**फोंडा, दि. १६ : धारबांदोडा येथील प्रतापनगर परिसरातील काजू बागायतीत सोमवारी (१६ जून) सकाळी एका तरुणीचा गळा चिरलेला मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. ही घटना मुख्य रस्त्यापासून अवघ्या काही मीटर अंतरावर घडल्याने खुनाचा संशय अधिक बळावला असून, फोंडा पोलिसांनी याप्रकरणी अज्ञात व्यक्तींविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला आहे.**

पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत तरुणीच्या गळ्यावर धारदार शस्त्राने वार केल्याचे आढळून आले असून, तिच्या अंगावर काळ्या रंगाचा टी-शर्ट, काळी जीन्स व काळ्या सँडल्स होत्या. घटनास्थळी तिच्या पर्समध्ये एक जुने रेल्वे तिकीटही आढळून आले आहे, ज्यावरून तपासाची दिशा निश्चित केली जात आहे.



या संदर्भात फोंडा उपविभागीय पोलिस अधिकारी (डीवायएसपी) शिवराम वायंगणकर यांनी सांगितले की, मृतदेहाची ओळख अद्याप पटलेली नाही. विविध पोलिस ठाण्यांमध्ये तसेच रेल्वे स्थानकांवर लुकआउट नोटीस जारी करण्यात आली आहे.

फॉरेन्सिक आणि श्वान पथकासह पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पुरावे संकलित करण्याचे काम हाती घेतले आहे. मात्र, सध्या पावसाळा सुरू असल्याने पुरावे मिळवताना अडचणी येत आहेत, अशी माहिती पोलिसांनी दिली.शवविच्छेदनासाठी मृतदेह स्थानिक शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आला असून, त्यातून हत्या नेमकी कशी झाली याचा खुलासा होण्याची शक्यता आहे. पोलिसांनी घटनास्थळी रक्ताचे डाग आणि आसपासच्या भागातील हालचालींचा बारकाईने अभ्यास सुरू केला आहे.

घटनास्थळी भेट देणाऱ्या धारबांदोडा पंचायत क्षेत्राचे सरपंच बालाजी गावस यांनी शंका व्यक्त केली की, या युवतीचा खून इथेच करण्यात आला असावा किंवा दुसरीकडे खून करून मृतदेह येथे आणून टाकण्यात आला असावा. त्यामुळे महामार्ग आणि मुख्य रस्त्यांवर सीसीटीव्ही बसवण्याची गरज आहे. प्रत्यक्षदर्शींच्या माहितीनुसार, एक स्थानिक युवक काजू बियाणे गोळा करत असताना त्याला झुडपांमध्ये मृतदेह दिसून आला, त्यानंतर पोलिसांना तत्काळ माहिती देण्यात आली.

या घटनेमुळे प्रतापनगर परिसरात भीतीचं वातावरण पसरले असून, स्थानिक रहिवाशांनी जलद न्याय व आरोपींचा लवकरात लवकर शोध लावण्याची मागणी केली आहे.

दक्षिण गोवा पोलिस अधीक्षक टीकम सिंग यांनी घटनास्थळी भेट देऊन तपासाचा आढावा घेतला आहे. त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तत्काळ आणि सखोल चौकशीचे निर्देश दिले आहेत. पोलिसांना सध्या मृत तरुणीच्या ओळखीचा धागा मिळविण्यासाठी रेल्वे तिकीट, श्वान पथकाची हालचाल व परिसरातील सीसीटीव्ही फूटेजचा आधार घ्यावा लागणार आहे.

## निवडक

### संघर्ष पेटणार! राजधानी तेहरानवर इस्त्रायलचे हल्ले

तेल अवीव, दि. १६ : इराण आणि इस्त्रायलमधील संघर्षाची धग आणखी तीव्र होत चालली आहे. दोन्ही देशांकडून एकमेकांवर जोरदार हल्ले केले जात आहेत. शनिवारी रात्री इस्त्रायलने इराणच्या लष्करी तळांना लक्ष्य केले. प्रत्युत्तरात इराणने पुन्हा एकदा इस्त्रायलवर मोठ्या प्रमाणात क्षेपणास्त्रे डागली आहेत. यामुळे संघर्ष पेटण्याची शक्यता निर्माण झाली आहे. दरम्यान, अमेरिका आणि इराणमधील चर्चा देखील रद्द करण्यात आली आहे. इस्त्रायलच्या हल्ल्यांनंतर अमेरिकेसोबतच्या अणुचर्चा या निरर्थक असल्याचे इराणने म्हटले आहे.

इराणच्या सरकारी टीव्हीच्या वृत्तानुसार, शहराच्या पूर्व आणि पश्चिम भागात स्फोटांचे आवाज ऐकू येत आहेत. इस्त्रायली सैन्याने रविवारी पहाटे सांगितले की, हल्ल्यात इराणचे संरक्षण मंत्रालयाचे मुख्यालय आणि एका मोठ्या तेल डेपोला लक्ष्य करण्यात आले. इस्त्रायली सैन्याने तेहरानभोवती इराणच्या अणुकार्यक्रमाशी संबंधित ठिकाणांना लक्ष्य केल्याचा दावा केला आहे.

इराणने इस्त्रायलवर आणखी एक क्षेपणास्त्र हल्ला केला आहे. शनिवारी मध्यरात्री इस्त्रायलच्या सुरक्षा मंत्रिमंडळाची बैठक सुरू असताना हे हल्ले झाले. इराणच्या रिव्होल्यूशनरी गार्डचे म्हणणे आहे की, इराणी क्षेपणास्त्रांनी इस्त्रायली विमानांसाठी इंधन तयार करणाऱ्या सुविधांना लक्ष्य केले. इराणने पुन्हा एकदा सांगितले आहे की, जर इस्त्रायल हल्ले करत राहिले तर इराण देखील क्षेपणास्त्रांचा मारा सुरु ठेवेल.

# अन्न सुरक्षा मोहिमेंतर्गत ८० धाडी !

## ३५० हून अधिक आस्थापने तपासली | केळी, मांस, काजू विक्रीवर कारवाई

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. १६ :**अन्न आणि औषध प्रशासनाने (एफडीए) गोव्यातील अन्न सुरक्षा आणि स्वच्छतेच्या नियमांची पायमल्ली करणाऱ्या आस्थापनांवर कठोर कारवाई करत विशेष मोहिमेद्वारे गेल्या काही महिन्यांत ८० हून अधिक छापे टाकले असून, या छाप्यांमध्ये ३५० पेक्षा अधिक आस्थापनांची तपासणी करण्यात आली आहे. ही मोहीम २०२४ च्या ऑगस्ट महिन्यात सुरू करण्यात आली होती. एफडीएच्या संचालिका श्वेता देसाई यांनी ही माहिती हेराल्डशी बोलताना दिली.

देसाई म्हणाल्या, गोव्यात अन्न विक्रीत होत असलेल्या घातक आणि अस्वच्छ प्रकारांबाबत अनेक तक्रारी आमच्याकडे आल्या होत्या. विशेषतः उत्तर गोव्याच्या किनारपट्टी भागातील काजू विक्रेत्यांविरोधात अनेक पर्यटकांनी अन्नात भेसळ व निकृष्ट दर्जाबाबत नाराजी व्यक्त केली होती. त्यानंतर आम्ही विशेष मोहीम राबवत तपासण्यांची मालिका सुरू केली.

एफडीएची मोहीम सुरुवातीला कळंगुट, कांदोळी आणि बागा येथील काजू दुकानांवर केंद्रित होती. पर्यटकांनी खाल्ल्यावर त्रास होतो किंवा खरेदी केलेले काजू निकृष्ट दर्जाचे निघतात, अशी अनेक तक्रारी करण्यात आल्या होत्या. काजूच्या प्रकारांत भेसळ, अयोग्य साठवणूक व चुकीचे लेबलिंग यांचा आम्ही तपास केला. अनेक विक्रेत्यांकडे परवाने नव्हते किंवा त्यांनी भेसळयुक्त माल विक्रीसाठी ठेवला होता, असे देसाई यांनी स्पष्ट केले.

काजू विक्रेत्यांनंतर मोहिमेचा फोकस रेस्टॉरंट्स आणि रस्त्यावरील खाद्यपदार्थ विक्रेत्यांकडे वळवण्यात आला. विशेषतः चिकन शॉर्मा , वडा पाव, भेळपुरी आणि फळांचे रस विकणारे हातगाडे यांच्या स्वच्छतेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले. बार्देश , पेडणे , तिसवाडी आणि साष्टी या तालुक्यांमध्ये हे निरीक्षण अधिक स्पष्टपणे दिसून आले.

एफडीएने अशा अनेक ठिकाणी छापे टाकून स्वच्छतेचे निकष न पाळणाऱ्या विक्रेत्यांना नोटिसा दिल्या. अनेक ठिकाणी हाताळणीसाठी पाण्याची सोय नव्हती, स्वच्छता पूर्णतः दुर्लक्षित केली जात होती, तर काही ठिकाणी मांस व दुग्धजन्य पदार्थ योग्य तापमानात साठवले जात नव्हते, असे देसाई यांनी सांगितले.

या तपासणीत मडगावमधील एका रेस्टॉरंटमध्ये ४५० किलोहून अधिक लेबल नसलेले मांस आढळून आले, जे कोणत्याही अधिकृत माहितीशिवाय खुलेपणाने साठवले जात होते. यानंतर ते संपूर्ण मांस नष्ट करण्यात आले. ही घटना गंभीर होती.

पान २ ▶

# रस्ते अपघातांत 'रेंटल व्हेइकल्स'चा वाढता वाटा ?

■ *टीम दैनिक हेराल्ड*

▶ **मुख्यमंत्री सावंतांच्या वक्तव्यानंतर पुन्हा चर्चेचा विषय**

**पणजी, दि. १६ :** गोव्यातील रस्ते अपघातांपैकी तब्बल ७० टक्के अपघात पर्यटकांकडून वापरल्या जाणाऱ्या भाडेकरू वाहनांशी संबंधित असल्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी अलीकडेच केलेल्या वक्तव्यामुळे या व्यवसाय मॉडेलबाबत नव्याने वादग्रस्त चर्चा सुरू झाली आहे.

मुख्यमंत्र्यांच्या वक्तव्यानंतर या क्षेत्राशी संबंधित अनेक घटकांनी प्रतिक्रिया दिल्या असून रस्ते सुरक्षेबाबत प्रभावी उपाययोजना करण्याची मागणीही जोर धरू लागली आहे.

हेराल्ड मिडियाशी बोलताना उत्तर गोवा रेंटल कॅब असोसिएशनचे अध्यक्ष नितेश चोडणकर यांनी पर्यटकांकडून होणाऱ्या अपघातांचे प्रमाण मान्य करतानाच वाहन वितरित करताना पुरेशी दक्षता घेतली जाते, यावर भर दिला.

गाडी देताना आम्ही पाहुण्यांची शारीरिक स्थिती तपासतो. दारू पिलेली नसल्याची खात्री करतो आणि वाहन सावधपणे चालविण्याच्या सूचना देतो. पण तरीही काही पर्यटक

पान २ ▶





ऑफर्स 30 जून, 2025 पर्यंतच वैध.* Hyundai EXTER आणि Grand i10 NIOS मध्ये Hy-CNG Duo उपलब्ध. स्पेसही. मायलेजही.
##डिपॉझिटचे वैध प्रमाणपत्र दाखवल्यास अतिरिक्त स्क्रॅपेज बोनस उपलब्ध. #CSD आणि KPKB ग्राहकांसाठी अतिरिक्त लाभ.

Hyundai Cl!ck to Buy Scan here | 3 YEAR Unlimited** Kilometer Warranty, Up to 7 years extended warranty^ | 3 YEAR Road Side Assistance(RSA)*** | UP TO 5 YEAR Shield of Trust Service Packages~ | Hy-CNG Duo | HYUNDAI

For Information Contact: Toll Free: 1800114645 Porvorim: Alcon Hyundai, Ph: 7030938989 Margao: Alcon Hyundai, Ph: 7030938989 Verna: Goa Hyundai, Ph: 6699999, 9822131489 Tivim: Goa Hyundai, Ph: 8390965558 Ponda: Goa Hyundai, Ph: 2313375, 9822588861

my Hyundai app | Hyundai Promise Certified Pre-Owned Car | Scan to chat with us or give a missed call at 9555295868

*Terms & Conditions apply. For more details, visit your nearest Hyundai showroom. Benefits mentioned include cash, corporate, either exchange or scrappage benefits as applicable. Benefits mentioned may vary from city to city. ##Scrappage bonus will be available against a valid certificate of deposit (issued by government approved and operational scrappage center) and exchange of old car. In case the customer is giving certificate of deposit but not physically exchanging his old car and buying a new car - then only scrappage bonus of ₹ 5 000 will be paid. Benefits may vary with variants. **3-year warranty or upto 100 000 km whichever is earlier for Grand i10 NIOS, AURA, i20 & i20 N Line. 3-year unlimited km warranty is applicable for EXTER, VENUE, VENUE N Line, CRETA, CRETA N Line, CRETA Electric, ALCAZAR, TUCSON, VERNA and IONIQ 5. ^Upto 7 Years extended warranty is available for Grand i10 NIOS, i20, i20 N Line, AURA, VERNA, EXTER, VENUE, VENUE N Line, CRETA, CRETA N Line, CRETA Electric, ALCAZAR & TUCSON in all variants (Petrol/Diesel/CNG) and subject to payment. ***3 years Roadside Assistance (with taxi support & introduction of 10 year retail program). ~For detailed T&C of RSA, Shield of Trust & Super, kindly visit Hyundai India website. This advertisement and car shown here is for creative representation purposes only and the depictions are for illustrative purposes. Features and specifications shown may vary or may not be a part of standard fitment and are subject to change without prior notice. Hyundai Motor India Limited reserves the right to change specifications, colour, equipment and schemes at any time without prior notice. The black shade on glasses are due to lighting effect. Size and colour may appear to vary due to lighting and position effect. Extended Warranty and Shield of Trust & Super are on payable basis. For more details on warranty, please refer owners' manual, #CSD: Canteen Stores Department, KPKB: Kendriya Police Kalyan Bhandar. INNOCEAN-030/25 MAR